Rotary Club of Beed Midtown
# MIRROR
UNITE FOR GOOD Rotary
अंक-४
Club No. 27961 RI Year 2025-26
सोमवार दि.२७ ऑक्टोबर २०२५

## रोटरी क्लब व राजयोग फाऊंडेशनतर्फे १५ संस्था व आश्रमासह अतिवृष्टीग्रस्त कुटुंबाची दिवाळी केली गोड








(बीड वार्ता):- रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन व राजयोग फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गेले ९ वर्षापासून समाजातील गोरगरीब, सर्वसामान्य जनता तसेच विविध सामाजिक संस्थेमध्ये वृद्ध, निराधार, वेगवेगळ्या आजाराने ग्रस्त अशा नागरिकांसाठी दिवाळीनिमित्त फराळ वाटप आणि विविध साहित्य वाटून दिवाळी गोड व आनंदी करण्याचा प्रयत्न रोटरीतर्फे करण्यात आला. यावेळी प्रसायदान प्रकल्प ढेकणमोह, आपला परिवार नेकनूर, लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे वृद्धाश्रम घाटसावळी, शांतीवन आर्वी, सेवाश्रम येळंब, आजोळ परिवार राक्षसभुवन, कामधेनू वृद्धाश्रम कोळवाडी, इन्फंट आश्रम पाली, सहारा बालग्राम गेवराई, स्नेहसावली रामनगर, निवारा बालगृह सौताडा, जिव्हाळा बेघर निवारा केंद्र बीड,रोटरी अन्नछत्र बीड, विहान प्रकल्पातील दुर्धर रुग्ण कुटुंबे अशा विविध संस्थांमध्ये दिवाळी गोड करण्यात आली. यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष रो.इंजि. राहुल बोरा, सचिव रो.डॉ. प्रकाश कोंका, राजयोगचे फाऊंडेशनचे अध्यक्ष शुभम धुत व सर्व रोटरीयन बहुसंख्येने उपस्थित होते. प्रो.चे.रो.डॉ. सुरेंद्र बजाज यांनी उत्कृष्ट व्यवस्थापन केले.




RI President :
Rtn. Francessco Arezzo



District Governor :
Rtn. Sudhir Lature



Assitant Governor :
Rtn. Kalyan Kulkarni



President
Rtn.Er. Rahul Bora



Secretary
Rtn.Dr. Prakash Konka



Editor :
Rtn.Balaji Gharat

## रोटरी दांडिया महोत्सवात रोटरी परिवाराने आनंद लुटला









रोटरी दांडिया महोत्सवात रोटरी परिवाराने धमाल केली. यामध्ये बेस्ट ड्रेसिंग, बेस्ट जोडी प्लेअर, बेस्ट ग्रुप प्लेअर, बेस्ट दांडिया ॲन्ड गरबा प्लेअर, मेल, फिमेल ॲन्ड किड, बेस्ट नॉनस्टॉप प्लेअर, बेस्ट एक्स्प्रेशन प्लेअर असे विविध पुरस्कार देण्यात आले. रो.आशा भारती व रो. साधना बोरा यांनी प्रोजेक्ट यशस्वी केला. अध्यक्ष, सचिव यांनी मेहनत घेतली.



Scanned with OKEN Scanner

Rotary Club of Beed Midtown
MIRROR
UNITE FOR GOOD
Club No. 27961 RI Year 2025-26

## रोटरी क्लब व गुजराती समाज यांच्या वतीने रक्तदान शिबीर व हेल्थ चेकअप कॅम्प संपन्न



(बीड वार्ता):- रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन व गुजराती समाज यांच्या वतीने संत शिरोमणी श्री जलारामबप्पा जयंती निमित्त रक्तदान शिबीर व हेल्थ चेकअप कॅम्प आयोजित करण्यात आला होता. यामध्ये सिव्हील सर्जन बीड यांच्या वतीने बीड जिल्हा रुग्णालय या ठिकाणी रक्ताचा तुटवडा जाणवत असल्यामुळे रक्तदान शिबीर घेण्याचे आवाहन करण्यात आले होते. यामुळे रक्तदान शिबीराचे आयोजन करून जिल्हा रुग्णालय यांना आवश्यक असणारा रक्ताचा पुरवठा करण्यात आला तसेच बहुसंख्येने उपस्थित असणारे रोटरी परिवार, गुजराती समाज यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यामध्ये सी.बी.सी., एच.बी., एच.बी.एस.जी. शुगर टेस्ट, कॅन्सर चाचणी, व्हिटामीन डी व बी १२ इत्यादी तपासण्या विनामुल्य करण्यात आल्या. यामध्ये जाग्यावरती तात्काळ रिपोर्ट देऊन आजाराचे निदान करण्यात आले तसेच गंभीर आजाराच्या तपासण्या मोबाईलवरती पीडीएफ फाईल स्वरुपामध्ये काही दिवसामध्ये उपलब्ध करण्यात आल्या. या शिबीराच्या माध्यमातून महिला वर्ग यांनी समाधान व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी गुजराती समाज आणि रोटरी परिवार बहुसंख्येने उपस्थित होता. यावेळी रोटरीचे अध्यक्ष रो.इंजि. राहुल बोरा, सचिव रो. डॉ. प्रकाश कोंका, गुजराती समाजाचे रो. सुरेश बुद्धदेव, रो. अतुल संघानी तसेच अध्यक्ष, सचिव व समाजातील व्यापारी वर्ग बहुसंख्येने उपस्थित होते.

## रोटरी कोजागिरी पौर्णिमा महोत्सवाच्या माध्यमातून रोटरी परिवाराला आनंद व फेलोशिपची मेजवानी





(बीड वार्ता):- रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनच्या वतीने एम.आय.डी.सी.या ठिकाणी कोजागिरी पौर्णिमा घेण्यात आली. यामध्ये विविध गेम, दांडिया महोत्सवातील बक्षीस वितरण आणि फेलोशिप याने रोटरी परिवारामध्ये उत्साहाचे वातावरण होते.

## जागतिक पोलिओ दिनानिमित्त रोटरी क्लबच्या वतीने एंड पोलिओ नाऊ अॅवेरनेस रॅली संपन्न





(बीड वार्ता):- जागतिक पोलिओ दिनानिमित्त रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन आणि जिल्हा रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने पोलिओ जगजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा रुग्णालय ते बीड शहरातील विविध चौकातून ही रॅली जनजागृती करत पुन्हा जिल्हा रुग्णालय या ठिकाणी समारोप करण्यात आला. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रोटरीचे अध्यक्ष रो. इंजि. राहुल बोरा, रो. डॉ. प्रकाश कोंका, पी.डी.जी.रो.हरिष मोटवाणी, आय.एम.ए.चे अध्यक्ष डॉ. अनंत मोरे, आर.एम.ओ. डॉ. मुजाहिद, प्राचार्य बेद्रे मॅडम, कुलथे मॅडम, गिरी मॅडम यांची उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन म्हणून पीडीजी रो. हरिष मोटवाणी यांनी आपले मत व्यक्त केले. यामध्ये ते म्हणाले की, रोटरी इंटरनॅशनलने १९७९ साली पोलिओ विरुद्ध लढाई सुरू केली. १९८८ मध्ये डब्ल्यु.एच.ओ., युनिसेफ, सी.एफ.सी., सी.डी.सी. आणि बील गेट्स फाऊंडेशनसोबत ग्लोबल पोलिओ अॅरिडिकेशन इनिसीटिव्ह सुरू केली. रोटरीने आतापर्यंत २.६ अब्ज डॉलर्सहून अधिक निधी दिला असून लाखो रोटरीयन स्वयंसेवक म्हणून जगभरात सहभागी झाले. आणि २०१४ मध्ये पोलिओ मुक्त देश घोषित करण्यात आला. या कार्यामध्ये रोटरीचा सिंहाचा वाटा आहे. अशा प्रकारच्या भावना व्यक्त करण्यात आल्या. यावेळी प्रो.चे.प्रो.डॉ. शिवाजी देशमाने, सुत्रसंचालन रो.विशाखा सुर्यवंशी यांनी केले. आभार प्रदर्शन रो.डॉ. प्रकाश कोंका यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी रोटरीचे बहुसंख्य मेंबर उपस्थित होते. जनजागृती फेरीच्या माध्यमातून बीड शहरामध्ये रोटरीविषयक जनजागृती निर्माण झाली. रस्त्यावरील सामान्य नागरिक रोटरीने पोलिओविषयक कामाविषयी माहिती झाली. तसेच शल्यचिकित्सक डॉ. राऊत साहेब यांच्या हस्ते काही बालकांना पोलिओचा डोस देण्यात आला.अशा प्रकारे जनजागृती रॅली संपन्न झाली.



## रोटरीच्या वतीने बीड शहरातील नामवंत बलभीम कॉलेज, के.एस.के. कॉलेज, बंकटस्वामी कॉलेज येथे मेगा हेल्थ चेकअप कॅम्प संपन्न






(बीड वार्ता):- रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन, सिव्हील हॉस्पिटल बीड, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना यांच्या वतीने बंकटस्वामी महाविद्यालय, के.एस.के. कॉलेज, बलभीम कॉलेज या ठिकाणी ओरल टेस्ट, डोळ्यांची तपासणी, रक्तामधील अनामिया चेकअप कॅम्प तसेच विविध आजारांची तपासणी या महाविद्यालयातील तरुण व तरुणींची करण्यात आली. यावेळी त्यांना मोफत सल्ला, मोफत उपचार व पुढील तपासणीसाठी योग्य त्या ठिकाणी पाठवण्यात आले. या कॅम्पमध्ये हजारो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. मोबाईलच्या अतिरिक्त वापरामुळे तसेच वाचन संस्कृती लोप पावल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वेगवेगळे मानसिक, बौद्धीक आजार जाणवत होते. यावेळी विद्यार्थ्यांना समुपदेशन करून मार्गदर्शन करण्यात आले. या प्रोजेक्टसाठी रोटरीचे अध्यक्ष रो.इंजि. राहुल बोरा, सचिव रो.डॉ. प्रकाश कोंका, प्रो.चे. रो. विशाखा सुर्यवंशी, रो.डॉ. धनराज वाघमारे, रो.डॉ. प्रविण ढगे, डॉ. स्वप्नील उन्हाळे यांनी विशेष मेहनत घेऊन प्रोजेक्ट यशस्वी केला.

## रोटरीने बालाघाट हिल मॅरेथॉनमधील स्पर्धकांना थंड शॉवरची व्यवस्था केली




## रोटरीने १०३ दिव्यांगांना बॅटरीवर चालणारे कृत्रिम हात देऊन सक्षम केले





(बीड वार्ता):- रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन, आर्य वैश्य महासभा जिल्हा बीड, इनाली फौंडेशन पुणे, रोटरी क्लब ऑफ पुणे डाऊनटाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ८ व ९ नोव्हेंबर २०२५ रोजी जिवनज्योत हॉस्पिटल या ठिकाणी जे अपघाताने आपले हात गमावले आहेत अशा दिव्यांगांना बॅटरीवर चालणारे इलेक्ट्रॉनिक प्रॉस्थेटिक हात मोफत देण्यात आले. यामध्ये पहिल्या दिवशी ३५ दिव्यांगांना उजवे हात आणि २३ दिव्यांगांना डावे हात बसवण्यात आले. दुसऱ्या दिवशी २१ उजवे आणि २४ डावे हात बसवले गेले असे एकुण १०३ हात दिव्यांगांना बसवण्यात आले. हात मिळाल्यामुळे दिव्यांगांच्या चेहऱ्यावरती हास्य फुलून आले. तसेच या हाताचा उपयोग करून आम्ही आता दिव्यांग न राहता सक्षम होणार आहेत हा एक विश्वास त्यांच्या मनात जाणवत होता व ते आपसात व्यक्त करत होते. हे हात बसवल्यानंतर लॅपटॉप चालवणे, गाडी चालवणे, वैयक्तीक स्वत:ची कामे करणे दिव्यांगांना सोपे जाणार आहे. यामध्ये बीड व विविध तालुक्यातून तसेच महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून रुग्ण उपस्थित होते. या शिबीराचे उद्घाटन पी.डी.जी. रो. ओम मोतीपवळे, गोविंद बिडवई, प्राजक्ता कुंभार, प्रा. प्रदीप मुनोत, डॉ.अनिल सानप, डॉ.रो. किरण सवासे आणि परविन शेख यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. समारोप समारंभ डी.जी. रो.इलेक्ट जयेश पटेल, रो. पी.डी.जी. रे. हरिष मोटवाणी यांच्या उपस्थितीत पार पडला. पुना डाऊनटाऊन यांच्या फ्लँग एक्स्चेंज कार्यक्रम झाला. यावेळी रोटरीचे अध्यक्ष रो. इंजि. राहुल बोरा, सचिव रो. डॉ. प्रकाश कोंका, आर्य वैश्य महासभेचे अध्यक्ष रो. सुर्यकांत महाजन, सचिव अजय रुद्रवार यांनी पुढाकार घेतला. प्रो.चे. म्हणून यशस्वीरित्या जबाबदारी आणि व्यवस्थापन रो.डॉ. निलेश जगदाळे यांनी केले. यावेळी वैभव झरकर, डॉ. गवते सर, डॉ. घनघाव सर आणि जीवनज्योत हॉस्पिटलचा स्टाफ चे सहकार्य लाभले. या उपक्रमात रो.नितीन गोपन, रो.डॉ.सुधीर येवले, रो. संजय गुप्ता, रो. भारत शेटे, रो. बद्रीनारायण मानधने, रो. दिनेश लोळगे, रो. नितीन भोसले, रो. सर्वज्ञ जोशी, रो. सुधाकर इंगळे, रो. जितेंद्र बोरा, रो. जनार्दन दहिवाळ, रो. विशाखा सुर्यवंशी, रो.बाबासाहेब कुडके, रो.प्रकाश मंत्री यांनी मेहनत घेतली.


**आपल्या घराच्या उत्कृष्ट बांधकामासाठी निर्मिती असोसिएटची निवड म्हणजे निर्मल, आनंदी वास्तुची निर्मिती**


NIRMITI ASSOCIATES
A VISION TO YOUR DREAMS

**आमच्या सुविधा**

- सर्व प्रकारचे बिल्डींग प्लॅन
- एलिव्हेशन प्लॅन
- इंटेरिअर डिझाईन
- बांधकाम परवाना
- अंदाजपत्रक (Estimate)
- मूल्यांकन (Valuation)
- गुंठेवारी
- साहित्यासह बांधकाम (Turn-Key-Projects)

ऑफिस : राजीव गांधी चौक, भक्ती कन्स्ट्रक्शन रोड, बीड

Nirmiti Associates मो. 8007987258, 8657000070





Scanned with OKEN Scanner

## स्वास्थ्य, समृद्धी और खुशीका रहस्य या कार्यक्रमात समाजसेवेसाठी रो.इंजि. राहुल बोरा व रो. दिनेश लोळगे यांना पुरस्कार प्रदान



## रो.मनोज थिगळे यांची रोटरी क्लबच्या सन २०२६-२७ वर्षासाठी सचिवपदी निवड




## रो. इंजि. नितीन गोपन यांची २०२६-२७ साठी ए.जी.म्हणून निवड!




## रोटरीच्या विकली मिटींगमध्ये विविध विषयावर मार्गदर्शन करत असताना रोटरीयन




(बीड वार्ता):- रोटरीच्या ऑक्टोबर महिन्यातील मिटींगमध्ये डॉ.रो. अनिता शिंदे, रो.ॲड.नामदेव साबळे, रो.अनुराग जैन, रो. जितेंद्र बोरा यांनी वेगवेगळ्या विषयावर सखोल ज्ञान देवून रोटरीच्या मिटींगमध्ये रंजकता आणली. तसेच या माहितीपर भाषणामुळे रोटरीच्या उपस्थितीमध्ये भर पडली. या माध्यमातून रोटरीचे नेतृत्वगुण विकसीत होण्यासाठी मदत होत आहे. त्याचबरोबर व्यक्तीमत्वाचा विकास होत आहे. अध्यक्ष रो.इंजि.राहुल बोरा, सचिव रो. डॉ. प्रकाश कोंका यांनी रोटरीयनला समोर येवून आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे.

## ऑक्टोबर महिन्यातील १००% उपस्थिती

※ स्पॉन्सरशिप ※
**रो.ॲड.नामदेव साबळे**

रो.इंजि. राहुल बोरा
रो.डॉ. प्रकाश कोंका
रो. भारत शेटे
रो.डॉ. निलेश जगदाळे
रो. राजकुमार बंब
रो. सुरेश बुद्धदेव
रो. जनार्दन दहिवाळ
रो. उमाकांत थोरात
रो. अमोल तळेकर
रो.ॲड. नामदेव साबळे
रो. जितेंद्र बोरा
रो. सर्वज्ञ जोशी
रो. बद्रीनारायण मानधने
रो.डॉ. सुरेंद्र बजाज
रो.प्रा. नितीन भोसले
रो. दिनेश लोळगे
रो.डॉ. शिवाजी देशमाने
रो. संजय गुप्ता
रो. संतोष पडोळे
रो. लक्ष्मण मळेकर
रो.डॉ. स्वप्नील उन्हाळे
रो. विशाखा सुर्यवंशी
रो.ॲड. शिवाजी जगताप
रो. साधना बोरा
रो.डॉ. सुधीर येवले
रो. फेरोज सय्यद

## रोटरी क्लबतर्फे सर्व ॲनेटस्ना वाढदिवसाच्या शुभेच्छा!

चि. आगम नहार- १ ऑक्टो.
चि. भाविक बुद्धदेव- २ ऑक्टो.
श्री. प्रशांत परभणे- २ ऑक्टो.
कु. अपूर्वा जाधव- ५ ऑक्टो.
श्रीमती सिमा दहिवाळ- ९ ऑक्टो.
कु. सृष्टी गुप्ता- १३ ऑक्टो.
चि.रुद्रांश शेळके- १३ ऑक्टो.
श्री. शुभम चरखा- १९ ऑक्टो.
चि.आदित्य वाघ- २० ऑक्टो.
श्रीमती शेजल अग्रवाल- २२ ऑक्टो.
कु.सिद्धी सरोदे- २६ ऑक्टो.
श्रीमती धनश्री खांदाट- २७ ऑक्टो.
डॉ. धनश्री कुलकर्णी- २९ ऑक्टो.
कु. निधी करमाळकर- २९ ऑक्टो.
चि. लक्ष लोढा- २९ ऑक्टो.
कु. रजनी गाडेकर- ३१ ऑक्टो.

## रोटरी क्लबतर्फे सर्व ॲन्स यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा!

सौ. शिला वानारे- ८ ऑक्टो.
सौ. जया काविन्ना- ८ ऑक्टो.
सौ. सोनल नहार- ८ ऑक्टो.
सौ. अनिता भोसले- १५ ऑक्टो.
सौ.डॉ.स्नेहा आळणे- १८ ऑक्टो.
सौ.डॉ.जयश्री बजाज- २८ ऑक्टो.
तबस्सुम बेगम- ३० ऑक्टो.

## रोटरी क्लबतर्फे सर्व रोटरीयन व ॲन्स यांना लग्न वाढदिवसाच्या शुभेच्छा!

रो.जयप्रकाश काविन्ना- ३० ऑक्टो
रो.राजेंद्र गाडेकर- ३१ ऑक्टो.



उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी महाराज यांचे आशिर्वादाने गौतम लब्धि फौंडेशन महाराष्ट्र कार्यकारिणीवर रो. जितेंद्र बोरा यांची निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन..!

## रोटरी क्लबतर्फे सर्व मेंबर्सना वाढदिवसाच्या शुभेच्छा!

रो.इंजि.अक्षय घोडके- ३ ऑक्टो.
रो.अनिल कुकडेजा- ४ ऑक्टो.
रो.इंजि.संकेत तांदळे- ७ ऑक्टो.
रो.गणेश मंत्री- १२ ऑक्टो.
रो.डॉ.अनिता शिंदे- १५ ऑक्टो.
रो.डॉ.प्रकाश कोंका- १६ ऑक्टो.
रो.गंगाबिशन करवा-१८ ऑक्टो.
रो.रविंद्र वारे- २७ ऑक्टो.
रो.भारत शेटे- २८ ऑक्टो.
रो.चंद्रप्रकाश शेठी- ३१ ऑक्टो.
रो.सुरेश बुद्धदेव- ३१ ऑक्टो.



**रो. गणेश वाघ यांचे वडील कै. गोविंदराव दादाराव वाघ यांचे दि. ८/१०/२०२५ रोजी दु:खद निधन झाले. या दु:खद प्रसंगात रोटरी परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली..!**

स्टॉकिस्ट ॲन्ड डिलर्स
※कारपेट ※मॅटींग
※फोम ※कुशन ※क्वायर
※रेडीमेड पडदे
※रेक्झीन ※बेड शिट्स
※गादी ※वेलवेट
※फर्निशिंग ※वॉलपेपर

सजावट
25
गृह सजावटीचे भव्य दालन
मुनोत कॉम्प्लेक्स, पुना गाडगीळच्या खाली,
सुभाष रोड, बीड - ४३१ १२२

रौप्य महोत्सवी वर्षात यशस्वी पदार्पण...
चंद्रप्रकाश सेठी
मो. 7588 85 85 85
9511 809 409

Scanned with OKEN Scanner